''नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास''
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७ ७३०१, २३८८ ००७३
WEB SITE : http://welcome.to/nkgsb
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। वादे वादे जायते तत्त्वबोधः ।।

मूल्य रु. ५/-

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ | वर्ष : ३३ | एप्रिल २०१२ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspapers of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V. P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच - वसंतोत्सव

**श्रीमती अपर्णा (वीणा) दीपक नाडकर्णी**
**आणि**
**डॉ. कल्पना (रेखा) विजय दिवेकर**
**सादर करीत आहेत**

**बहारदार कार्यक्रम व नावीन्यपूर्ण स्पर्धा**

- लहान मुलांचे नाच (नवीन नोंदणी नाही)
- ३० वर्षावरील महिलांसाठी डान्स स्पर्धा
- ३० वर्षावरील स्त्री-पुरुष जोडीसाठी डान्स स्पर्धा

आणि अनेक बसल्याजागी खेळायच्या स्पर्धा
कित्येक आकर्षक बक्षिसे
मोठ्या संख्येने स्पर्धांमध्ये भाग घ्या आणि कार्यक्रमाची मजा लुटा.

**तारीख :** रविवार २२ एप्रिल २०१२
**स्थळ :** सहयोग मंदिर, सहयोग मंदिर मार्ग, विष्णु नगर, नवपाडा, ठाणे
**वेळ :** संध्याकाळी ४.३० ते ८.३०

**संपर्क :**

**सुरेश पालेकर**
२५३६४३२८
९९६९४५५३७०

**मारुती दळवी**
९९६९८२९५०५

**PERFECT PEST CONTROL**
Government Licence Holder
**Relief from all kind of pests**
For Service Contact :
**Deepak Nadkarni (9869058481)**
**Off.:** Bldg. No. 99, Anandvan C.H.S., Near Hanuman Mandir, Samata Nagar, Kandivali (E), Mumbai - 400 101. • **Tel.:** 2884 2981 • **E-mail :** ppcmumbai@yahoo.in

## संपादकीय
## समाजसेवानिधीचा विनियोग

मुखपत्रिकेच्या प्रत्येक अंकात संघाला व एज्युकेशन सोसायटीला मिळालेल्या देणग्यांची माहिती देण्यांत येते. या देणग्यांच्या रकमांचा विनियोग कसा होतो व गरजू व्यक्तींना किती साहाय्य मिळते त्याचा तपशील उभय संस्थांच्या वार्षिक अहवालांत दिला जातो, ही माहिती सर्वसाधारण वाचकांनाही कळविणे, हे आमचे कर्तव्य आहे. संस्थांच्या पारदर्शी कार्याची जाणीवही यांमुळे सर्वांना होईल.


या अंकांत संघाच्या विनियोगाची माहिती देण्यांत येत आहे. एज्युकेशन सोसायटीमार्फत लाभार्थींना मिळणाऱ्या साहाय्याचा तपशील नंतर देण्यांत येईल.

संघाला मिळणाऱ्या देणग्यांची रक्कम विविध बँकांत मुदत ठेवींच्या रुपाने गुंतविण्यांत येते. अशा ठेवींवरील व्याज व इतर कांही किरकोळ देणग्या हे त्या वर्षाचे उत्पन्न म्हणून गणले जाते. २०१०-११ या वर्षाचे उत्पन्न सोळा लाख रुपयाहून अधिक होते. या उत्पन्नातून प्रशासकीय खर्च वजा जाता शिल्लक रकमेंतून लाभार्थींना साहाय्य दिले जाते. दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे या साहाय्यात वाढ करणे आवश्यक असते. ज्ञातिबांधवांकडून सतत मिळणाऱ्या देणग्यांमुळेच ही वाढ करणे शक्य होते. लाभार्थींना सध्या मिळणाऱ्या साहाय्याचा तपशील पुढीलप्रमाणे

| कुटुंबातील व्यक्ती | मासिक साहाय्य रु. | संख्या |
|---|---|---|
| १ | १,८०० | १९ |
| १ + १ | २,३०० | १२ |
| १ + २ | २,८०० | ८ |
| ज्येष्ठ नागरिक | २,३०० | २० |
| **एकूण** | | **५९** |

याशिवाय गेल्या आर्थिक वर्षात तीस गरजूंना सुमारे साडेचार लाख रुपये एवढी रक्कम वैद्यकीय साहाय्य म्हणून वितरीत करण्यांत आली. त्यांत कॅन्सर, डायालिसीस सारख्या खर्चिक व्याधींसाठी दिलेल्या भरघोस साहाय्याचाही समावेश आहे. गेल्या वर्षी तीन कुटुंबांना त्यांच्या घरांतील मुलींच्या विवाहखर्चाला मदत म्हणून एकूण सत्तर हजार रुपये वितरीत करण्यांत आले.

हे परीक्षांचे दिवस आहेत. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा.





## एज्युकेशन सोसायटी - शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १ली ते १०वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०१२ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०१२ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील)
याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी. ए. कॉस्टिंग, एन.डी. ए., सिव्हिल सर्व्हिसिस इ.)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल (सांपत्तिक परिस्थितीची अट नाही)
- तत्सम

दहावी -बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,०००(प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. २,००.००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

## प्रकाशझोत

### आपल्या बँकेच्या अध्यक्षपदी श्री किशोर कुलकर्णी व उपाध्यक्षपदी श्री गणपती नाडकर्णी

सहकार क्षेत्रांत अग्रणी समजल्या जाणाऱ्या आपल्या बँकेची २०१२-१७ या पाच वर्षासाठी अलीकडेच संचालक पदासाठी बिनविरोध निवडणूक झाली. नूतन संचालकमंडळाच्या पहिल्या सभेंत अध्यक्षपदी श्री किशोर दिगंबर कुलकर्णी व उपाध्यक्षपदी श्री गणपती महेश्वर नाडकर्णी यांची निवड झाली. श्री कुलकर्णी हे २००० सालापासून बँकेच्या संचालक पदावर कार्यरत आहेत. गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत ते उपाध्यक्ष होते. ते पूर्वी रिलायन्स एनर्जी या उद्योगसमूहाच्या एच.आर.डी. व फायनान्स विभागाचे संचालक म्हणून काम करत होते. श्री नाडकर्णी हे २००३ सालापासून संचालक आहेत. ते व्यवसायाने चार्टर्ड अकांऊंटंट आहेत.

नवनिर्वाचित संचालक मंडळातील इतर सभासदांमध्ये राजन भट, नागेश फोवकार, सुनील शरद गायतोंडे, श्रीधर कामत, वासुदेव मसुरेकर, कौशल दिलीप मुझुमदार, अनिल भालचंद्र नाडकर्णी, नागेश दिनकर पिंगे, लक्ष्मीकांत प्रभू आणि सुजाता रांगणेकर यांचा समावेश आहे.

### डॉ. मंगेश कुलकर्णी यांची व्हिएन्ना विद्यापीठातील कामगिरी

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील जुन्या पिढीतील निष्ठावंत कार्यकर्ते कै.के. एम. कुलकर्णी यांचे नातू डॉ. मंगेश दिगंबर कुलकर्णी हे पुणे विद्यापीठात राज्यशास्त्र या विषयाचे प्राध्यापक आहेत. त्यांना दि. ८ ऑक्टोबर २०११ ते दि. ६ जानेवारी २०१२ या कालावधीत ऑस्ट्रिया या देशातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्हिएन्ना विद्यापीठात (स्थापना इ.स. १३६५) अभ्यागत प्राध्यापक (visiting professor) म्हणून निमंत्रित करण्यात आले. इंडियन काउन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स या संस्थेने तेथे स्थापन केलेल्या भारत-अभ्यास अध्यासनावर नियुक्त झालेले मंगेश हे पहिलेच प्राध्यापक होत.

व्हिएन्ना विद्यापीठातील दक्षिण आशिया, तिबेट व बौध्द धर्म यांच्या अभ्यासाला वाहिलेल्या विभागात डॉ.मंगेश कुलकर्णी यांनी 'समकालीन भारतीय शासन व राजकारण' तसेच 'भारतीय पुरुषत्व - शोध आणि बोध' हे दोन स्वत: तयार केलेले अभ्यासक्रम शिकविले. भारतीय पुरुषांच्या संघटना या विषयावर एक सार्वजनिक व्याख्यानही त्यांनी तेथे दिले. तसेच विज्ञानाचे तत्त्वज्ञान याबाबत तेथे झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

व्हिएन्ना विद्यापीठातील उत्कृष्ट ग्रंथालयाचा वापर करून डॉ. मंगेश कुलकर्णी यांनी दोन शोधनिबंध लिहिले. तसेच आपल्या तीन महिन्यांच्या वास्तव्यात त्यांनी सदर विद्यापीठात भारत-विषयक संशोधन करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

### सौ. विद्या वागळे यांना 'सप्तर्षी' तर्फे आयोजिलेल्या लेखन स्पर्धेत पुरस्कार

महाराष्ट्र व्यवसाय मार्गदर्शन केंद्राचे मुखपत्र 'सप्तर्षी' या मासिकाने 'जागतीकरणातून पर्यटकांतील नव्या उद्योग संधी' या विषयावर डिसेंबर २०११ मध्ये उद्योग विशेषांक प्रसिध्द केला होता. त्यासाठी त्यांनी एक लेखन स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे परीक्षक होते



श्री केसरी पाटील व श्री राम आगाशे (स्थापत्य अभियंता व साहित्यिक). या स्पर्धेत पाच जणांच्या लेखांना पुरस्कार मिळाले. त्यापैकी एक म्हणजे माहीम येथील सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे. त्यांनी लिहिलेला एक अभ्यासपूर्ण लेख सप्तर्षी च्या अंकात अंतर्भूत केलेला आहे. ५ फेब्रुवारी रोजी भरलेल्या एका खास समारंभात वीणा पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

सौ. वागळे या चतुरस्र व्यक्तिमत्त्व असलेल्या भगिनीचा यापूर्वी त्यांना विविध क्षेत्रांत मिळालेल्या अनेक पुरस्कारांबद्दल मुखपत्रिकेत वेळोवेळी उल्लेख आलेलाच आहे. याशिवाय आतांपर्यंत 'लज्जतदार कारवारी पाककृती', 'ए-वन ब्रेकफास्ट', 'चटकदार मालवणी पाककृती' व 'खाऊचा डबा' अश्या पाकशास्त्रावरील त्यांच्या चार पुस्तिका प्रसिध्द झालेल्या आहेत.

### एज्युकेशन सोसायटीच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक
### सोसायटीच्या सभासदांना सूचना

एज्युकेशन सोसायटीची कार्यकारिणी, निवडून आलेले एक अध्यक्ष, आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा अकरा सभासदांची असते. सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१२ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०१२-२०१५ या तीन वर्षासाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयांतून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसह अर्ज पूर्ण करून सोमवार दिनांक ३० एप्रिल २०१२, संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.


**Shailesh Gaitonde**

**Account Consultancy**

**OFFICE** : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai - 400 066. **Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 9869211055

**OFFICE TIME :** 10.00 am to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**

  ● *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society* ● *Accounts Books are maintained on Computer* ● *Monthly or Annual Report* ● *Statutory Audit from Panel Auditor* ● *Finalization of Accounts* ● *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## म. मा. ची फुल टु धमाल

काय, गंमत वाटली ना वरील नाव वाचून? कुणाची म.मा. नी कुठली तिची धमाल ? सुरुवातीलाच सांगते, खरोखरच ही एक गंमत आहे. या वयांत माझ्या मनांत आलेली. वाचाच तुम्ही, नीट वाटलंच तर या ''डोक्यालिटीला'' कौतुक करा.

त्याचं काय झालं, कांही वर्षांपूर्वी एक योजना माझ्या वाचनांत आली. ''स्त्रियांचे आत्मबल विकास केंद्र'', सहा महिन्याचा कोर्स होता. जरुरी पुरतं इंग्रजी बोलणं, बँकाचे व्यवहार, रिझर्व्हेशन वगैरे वगैरे. मी कुतुहलापोटी नाव घातलं. सहा महिन्यांची मुदत होती. आम्हांला शिकवायला 'आई' येत. त्यांच्या वात्सल्यात त्या माझ्यापण आई आहेत. त्या अखेरच्या माझ्या श्वासापर्यंत. असो.

त्या वर्गांत शिरताच आम्ही साऱ्या उभ्या राहून त्यांचं स्वागत करायचो. त्या खुर्चीवर बसताना साऱ्याजणी ''रामो राजमणी सदा विजयते'' हे म्हणायचो. नंतर दहा मिनिटे त्या आम्हांला बाहेरच्या जगांत कसं छान वागायचं याबद्दल सांगत नी मग अभ्यास सुरू.

आता खरी गंमत सुरू बरं. मला एकदा अशीच आयडियाची कल्पना सुचली. सध्या दूरदर्शनवर दाखवतात त्या मराठी मालिकांच्या माध्यमांतून आम्हांला नीतीचे धडे द्यायचं जर आईने ठरवलं तर आई असं सांगेल आणि पुढची सारी गंमत जमत गेली. आता कळलंच असेल तुम्हांला की, 'म.मा.' म्हणजे ''मराठी मालिका''

बरं कां ग बाळांनो, स्त्रियांच्या आत्मबल विकास केंद्राच्या तुम्ही साऱ्या जणी आता खंबीर कार्यकर्त्या झाल्या आहांत. तुमच्या आईवडिलांनी तुमचं **कन्यादान** करून त्या घरची लाडकी लेक दुसऱ्या **गोजिरवाण्या घरांत** सासुरवाशीण झाली. तुम्ही तुमचा हक्काच्या घरांचा **दहलेज** ओलांडून आलात. तो कांही **पिंजरा** नाही बरं. आजपर्यंत तुम्ही बघत आलेल्या **स्वप्नांच्या पलिकडे** असलेलं जग आहे हे, या जगांत सासू, सून, नणंदा, जावा अशी अनेक **नातीगोती** आहेत. सारी **पुणेरी मिसळच** म्हणाना. यांची **मनं उधाणं वाऱ्याचीच** असणार, कुणाची असेल **मड्डुम सासू नी ढड्डुम सून** असं ती तुम्हांला समजणार पण डरो मत, **चार दिवस सासूचे** असतात नेहेमी. त्या स्वत:लाच **होम मिनिस्टर** समजतात. समजू देत बापड्या. तुम्ही मात्र त्या कुळाची **धर्मकन्या** बनून या वळणावर आलां आहांत. ज्यांच्या नांवाने **कुंकू** लावून आलांत त्यांच्यांत **गुंतता हृदय हे** झालं का बस्स. सारे **बंध रेशमाचे**च होतात. काही घरांतील नणंदा, जावा तर अगदी **लज्जा** कोळून प्यायल्यासारख्या वागतात, पण **पारिजात** माहिती आहे ना? साऱ्या नात्याचा गंध त्याला असतो, सत्यभामेच्या अंगणातून सुभद्रेच्या अंगणात फुलं उधळणारा. तुम्हीच तुमच्या **भाग्यलक्ष्मी** आहांत. अधुनमधून **भांडा पण सौख्यभरे** बरं का ? **तुजवीण सख्या रे** असं लगेच वाटायलां हवं.



हो, समजा, तुम्हाला एखादी दु:खी, निराशावादी सखी भेटली तर तुमच्या व्यस्त कामातून थोडावेळ तरी तिच्याकरितां खर्च केलात तर काय **फुल टु धमाल** होईल माहिती आहे. तुमच्या चतुराईने **बोले तो मालामाल** कराल तिला. तुमच्या विकास पावलेल्या आत्मबलाचीच प्रचिती येईल बघा तुम्हांला. पूर्वीसारखे फक्त **ही वाट दूर जाते** आहे. काहीच स्वारस्य उरलं नाही असंच वाटायचं ना?

आतां ज्यांनी ज्यांनी आत्मबल केलं नाही अजून त्यांनी त्यांनी लगेच प्रवेश घ्या. अगदी **फिरून नवी जन्मेन मी** असंच म्हणा. कारण हें नुसतंच आत्मबल नसून आत्मबल ते आत्मबदल झालं आहे.

मंगळागौरीला **फू बाई फू**, फुगडी फू सारख्या फुगड्या खेळणार ना ? भले शाबास.

आतां शेवटचं गूज. तुमच्या संसारवेलीवर घुंगुरवाळे घातलेली छोटी छोटी पावलं **रुणुझुणु** करीत घरभर हुंदडणार नी साऱ्यांना **आनंदी आनंद** देणार. आजी आजोबांची एकच तारांबळ उडणार. या नवीन आलेल्या पाहुण्यांकडे खेळायचे कीं थोरल्या नातवंडांच्या ''**नाना ओ नाना**'' या हाकेला साद द्यायची. हे सारं आपल्याला सांगायला, साऱ्यांच्यामागे आपला भैरोबा असणारंच नी त्याला सोबत कोण देणार तर **कृपासिंधू श्री स्वामी समर्थ** व **ब्रह्मांड नायक श्री गजानन महाराज** मग काय लागे सुखाची चाहुल सखे तूं टाक **पुढचं पाऊल.**

। शुभम् भवतु ।

**दुर्गा वाघ, माहीम (२४४५५३७३)**


नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार

**"नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास" या त्रैमासिकाचे प्रकटन**

**From IV Rule 8**

१. **प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी.संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४.
२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक
३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी **राष्ट्रीयत्व :** भारतीय
**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.
४. **मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. संघ लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.
मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०१२** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

## ठाणे मंचची पंधरावी सहल

ठाणे मंचच्या वार्षिक सहलीचे हे पंधरावे वर्ष. ८ जानेवारी २०१२ रविवार रोजी वसई जवळील कल्याणी व्हिलेज येथे या वर्षीची सहल आयोजित केली होती. ठाण्याहून एक व मुंबईहून दोन बसेस साधारणपणे ९.३० वाजता रिसॉर्टला पोचल्या. गेल्यागेल्याच सर्वांना मिसळ पाव, शिरा असा नाश्ता देण्यात आला व त्यानंतर ठाणे मंचला पंधरा वर्षे झाल्याचे औचित्य साधून ठाणे मंचकडून प्रत्येक कुटुंबास एक ट्रॅव्हलिंग पाऊच व त्यात छोटा टर्कीश नॅपकीन अशी भेटवस्तू देण्यांत आली.

वज्रेश्वरी जवळ केंद्र शासनाचा 'आदर्श ग्राम' शिवाय अनेक पुरस्कार मिळालेले महाळुंगे नावाच्या आदर्श गावाला आम्ही गेलो. तिकडचे गाव प्रमुख श्री. मोरे यांनी स्वच्छता, पर्यावरणाची जाणीव, कुटुंबनियोजन, मुलींना जन्म देणाऱ्या मातांचा सन्मान, साक्षरता, व्यसनमुक्ती इ. अनेक बाबतीत तसेच गावातल्या प्रत्येक व्यक्तीने श्रमदान केले हे सर्व विस्ताराने सांगितले. आम्ही ज्या देवळांत बसलो होतो ते देऊळ सुंदर होते. एक वेगळा अनुभव !

रिसॉर्टवर परतल्यावर सर्वांनी मस्त व्हेज-नॉनव्हेज जेवणाचा आस्वाद घेतला. हंडी चिकन, कोलंबी भात, सुकट घालून केलेली वांग्याची भाजी असा नॉनव्हेज व मिक्स व्हेजिटेबल्स सॅलड, लोणचे इ. व्हेज असा मस्त मेन्यु होता. अशा मस्त जेवणानंतर सुस्ती येऊ नये म्हणून कांही वैयक्तिक कार्यक्रम व काही सर्वांसाठी गेम्स ठेवले होते.

श्री हिचकड व श्री दीपक बोरकर यांनी गाणी तर सौ. नीलिमा नाडकर्णी व श्री देविदास नाडकर्णी यांनी स्वरचित कविता पेश केल्या. छोट्या संजना भटनेही इंग्लिश कविता म्हटली. श्री पद्माकर तेलंग व श्री. अरुण कसबेकर यांनी नेहमीप्रमाणे विनोद सांगून करमणूक केलीच शिवाय कसबेकरांनी सर्व कारवारी लोकांनी एकत्र येऊन समाजासाठी काय काम करावे, हे गंभीरतेने सांगितले.

या रिसॉर्टवर एक गम्मत म्हणजे बर्फाचा गोळा, पॉपकॉर्न व बुढ्ढीके बाल हे बालपणीची आठवण देणारे पदार्थ खावयास मिळाले आणि ते सुध्दा एकदम फ्री मध्ये !

रसिका, शैलेश व प्रसाद या गायतोंडेजनी सर्वांसाठी तीन गेम्स ठेवले होते आणि सर्वांनीच भाग घेऊन हसतखेळत करमणूक करून घेतली.

शेवटी सर्वांनी चहा-कॉफी- बिस्किटे घेऊन आपण जसे गणपती बाप्पाची पुढच्या वर्षी वाट पाहतो तशीच पुढच्या वर्षीच्या सहलीची वाट पहात निरोप घेतला.

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे**



## पंधराही सहलीत भाग घेणारे एकमेव ज्ञातिबांधव राजू बोरकर

वर दिलेल्या लेखांत ठाणे मंचची 'पंधरावी सहल' असे नमूद केलेले आहे. या सर्व सहलींत उत्साहाने भाग घेणारी एकमेव व्यक्ती म्हणजे माहीमचे लोकप्रिय कार्यकर्ते राजू बोरकर हे मुद्दाम नमूद करायला हवे.

रौप्य महोत्सवी नव्हेच तर सुवर्णमहोत्सवी सहलीलाही उपस्थित राहण्याएवढे त्यांना आयुरारोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.... संपादक

### नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राम्हण संघ, मुंबई मंच

### निमंत्रण

ज्ञाति बांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने प्रेरित होऊन सालाबादप्रमाणे यंदाही मुंबई मंच सहर्ष सादर करीत आहे नाट्य, क्रीडा व नृत्य यांचा त्रिवेणी संगम

**उत्सव - २०१२**

**खास आकर्षणे :**

- मल्लखांब प्रात्यक्षिक
  सादरकर्ते - समर्थ व्यायम मंदिर, शिवाजी पार्क
- एकांकिका - कमरेक आयलॉ कस
  सादरकर्ते - माटुंगा मित्र मंडळ, कर्नाटक सोसायटी
- नव्या व जुन्या सदाबहार गाण्यांवर नृत्ये
  सादरकर्ते - ज्ञातीतील कलाकार

**वेळ** : शनिवार, दिनांक २ जून २०१२
सायंकाळी ६.३० वाजता

**स्थळ :** कर्नाटक संघ सभागृह, माहीम, मुंबई ४०० ०१६.

या कार्यक्रमाला आपण सर्वांनी उपस्थित राहून प्रतिसाद द्यावा यासाठी हे अगत्याचे निमंत्रण.

### Mumbai Manch : Monsoon Picnic

Mumbai Manch has organised a monsoon picnic on Sunday 19th August 2012. The location of site will be announced later. Contribution for the picnic is Rs. 500/- per person. Interested nature lovers may please contact Prasad Gaitonde : 98194 11337 or Sanjay Nadkarni : 98214 11366. Come and enjoy the nature with us.

## येयात येयात आमगेल्या कारवारा

*येयात येयात आमगेल्या कारवारा*
*पळयात पळयात ...........*
*देवगड, कुरूमगड, मदलिंगड, सदाशिवगड,*
*शिरवाड, शेजवाड, सानगड, आणि कडवाड*
*काजुबाग, कोडीबाग, सुरीबाग, देवबाग*
*माडीबाग, उंडैबाग, आर्वाबाग, बोरीबाग*
*मुडगेरी, मखेरी, सुकेरी, हैदरघाट*
*भांडीशिट्टो, गोपशिट्टो आणि जकातिकट्टो*
*अरगें, बिणगें, हळगे, उळगे*
*कोडार, तोडूर, शिद्दर, किन्नर*
*होटेगाळी, गोटेगाळी, अमदळ्ळी, माजाळी*
*मल्लापूर आणि हैदर अलीलें विलासपूर*
*कडिये, वैलेचेंडे, सकल्लेचेंडे, लबाडचेंडे*
*गुरूमठ, शंकरमठ, वैलोमठ, सकल्लोमठ*
*गुड्डेहळ्ळी, हळेकोट, नंदव्हाळ*
*तिळमाती आणि ढणढणे*

*पळयात पळयात .............*

*हांगची भांड, शिगमो आणि मेटावेली तरंगां*
*धैकालो, रथ, फेस्त आणि मोरम्म*
*जाई, जुई, अबोली, सबदळी*
*वोंवळा, कांदळां, चापी आणि कुडचापी*
*चिरपुंटा, कारंजां, बेडसां, जांब, बोरां*
*पिटकुळां, चुरणां आणि चारां*



*बिंबला, करमलां, चिंचो, भिरंडां*
*पणस, निरपणस, पपय, अननस*
*जांबळां, पेरां, आंवाळे, राजांवळे*
*रामफळ, शिताफळ, नाल्ल आणि सुपाऱ्यो*
*गोडांबो, पेरांबो, साररांबो आणि घोटां*
*मुसराद, ईशाडद, माविनकुराद, फर्नाद*
*समुद्रावेळ, काळी-अरबी संगम*
*घुमटा फाकं, खेळ, यक्षगान आणि नाटकां*
*येयात येयात आमगेल्या कारवारा.......*
*राबात हांगां तुमी जाय तितले दीस*
*मेळतलो तुमकां जाय त्या मासळीचो भूस.*

**विठ्ठलराय भट, आंबिवली** (९२२१३०९७५८)

### विवाह / वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| सावित्री बाळकृष्ण गायतोंडे, शिर्सी | व | सुमंत माधव शानभाग, बंगळूर |
| तरंग दुर्गादास कसबेकर, वसई | व | माधुरी प्रभू, अंधेरी |
| प्रज्ञेश किशोर कुलकर्णी, पार्ले | व | केतकी शांताराम हळदीपूरकर, पुणे |
| संपदा श्रीपाद नाडकर्णी, जोगेश्वरी | व | जीतेन परमार, मुंबई |
| गौरी प्रमोद पालेकर, अंधेरी | व | सागर सुरेश पालेकर, अंधेरी |
| कीर्ती श्रीकांत पावशे, फोंडा | व | मुकुल अनंत कामत, पुणे |
| मिहीर प्रकाश सबनीस, बोरीवली | व | राधा गोसावी, कांदिवली |
| माधुरी शिवराम (सतीश) तेलंग, कांदिवली | व | सुमीत सिंग, चेंबूर |
| दिप्ती श्रीकांत वागळे, पुणे | व | अतुल डेपालकर, चिंचवड |
| वल्लभ अरुण वागळे, पार्ले | व | नंदिनी शामसुंदर नाडकर्णी, जोगेश्वरी |
| अनुजा आनंद वागळे, घाटकोपर | व | सुजय शेणॉय, पवई |

## सदाशिवगड हायस्कूलचे मुख्याध्यापक व चित्ताकुला कैवल्यपुर मठाचे अर्चक श्री विश्वेश्वर सुखटणकर कालवश

सदाशिवगड येथील 'शुकामास्तराली शाळा' म्हणून परिचित असलेल्या शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री विश्वेश्वर सीताराम सुखटणकर यांचे ४ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. सायन्स विषयांत पदवी घेतल्यावर १९५७ साली ते या शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले. १ सप्टेंबर १९७९ ते ३१ जानेवारी १९९१ या कालावधीत म्हणजे सुमारे बारा वर्षे ते मुख्याध्यापक होते. पदार्थ विज्ञान, रसायन व गणित हे विषय शिकविण्यांत त्यांचा हातखंडा होता. ही शाळा चालविणाऱ्या सदाशिवगड एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या कार्यकारिणीवर १९९३ ते १९९८ दरम्यान त्यांनी उपाध्यक्ष म्हणूनही काम केले. त्यांच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशी त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी शाळेंत शोकसभा भरविण्यात आली होती.

सदाशिवगड गांवातील चित्ताकुला येथे सन १८७१ साली स्थापन केलेला श्रीगौडपादाचार्य स्वामींचा एक पुरातन मठ आहे. तेथील अर्चक हे पिढीजात सुखटणकर घराण्यांतील आहेत. श्री विश्वेश्वर सुखटणकर हे सहाव्या पिढीतले अर्चक होते. शाळेमध्ये मुख्याध्यापकाचे जबाबदारीचे पद सांभाळून सुध्दा त्यांनी या मठातील पूजाअर्चा करण्याचे पवित्र काम व व्यवस्थापनाचे जिकीरीचे काम कित्येक वर्षे निष्ठेने केले होते.

### निधन

| | | |
|---|---|---|
| यमुना यशवंत बोरकर | (चेंडीये) | ग्रांट रोड |
| प्रभाकर (पबा) श्रीपाद बोरकर | (कडवाड) | अंधेरी |
| देवीदास पांडुरंग बोरकर | (कारवार) | अंधेरी |
| शांता सदानंद (नंदा) दिवेकर | (केरवडी) | बोरीवली |
| कृष्णदास भालचंद्र गायतोंडे | (हळगे) | सांताक्रुज |
| नंदकुमार रामचंद्र इस्लूर | (सिरसी) | मालाड |
| विमल विश्वनाथ (श्रीपाद) करुर | (सिरसी) | वांद्रे |
| रत्नाकर मुकुंद करुर | (सिरसी) | लोणावळा |
| शांताराम विठ्ठल कसबेकर | (कडवाड) | हुबळी |
| अनसूया सदानंद कसबेकर | (कडवाड) | ठाणे |
| शारदा मंगेश कसबेकर | (कडवाड) | सांताक्रुज |
| मालिनी भवानीशंकर कसबेकर | (कडवाड) | गावदेवी |
| भवानीशंकर शांताराम कसबेकर | (कडवाड) | विरार |
| मिलिंद (बॉबी) यशवंत कसबेकर | (कडवाड), | पुणे |
| सुनंदा (हीरू) विश्वनाथ कंटक | (अंकोला), | बंगळूर |
| सीमा रमेश करंडे (पूर्वाश्रमीच्या नलिनी अनंत वाघ) | (सदाशिवगड), | अंधेरी |



| | | |
|---|---|---|
| सच्चिदानंद भवानी कुलकर्णी | (हळगे), | माहीम |
| आशा शरद कुलकर्णी | (हळगे), | दादर |
| गोदावरी रामकृष्ण कुलकर्णी | (किन्नर), | पार्ले |
| ललिता गजानन कुलकर्णी | (हळगे), | वांद्रे |
| माधव विठ्ठल कुलकर्णी | (हळगे), | दिल्ली |
| उमेश गणपत नाडकर्णी | (सांवरपै), | गोवालिया टँक |
| सुरेखा (सुनंदा) प्रभाकर नाडकर्णी | (मल्लापूर), | गोरेगाव |
| कुसुम विश्वनाथ नाडकर्णी | (अंकोला), | ठाणे |
| सुषमा प्रवीण पिकळे | (अंकोला), | धारवाड |
| राधा प्रमोद पालेकर | (बाड), | अंधेरी |
| सुरेश विश्वनाथ पालेकर | (तोडूर), | हुबळी |
| अनिल (नरेन्द्र) दत्तात्रय पालेकर | (बाड), | दादर |
| कुंदा काशिनाथ पावशे | (बाड), | दादर |
| शरद नागेश सलगर | (सदाशिवगड), | ठाणे |
| विश्वेश्वर सीताराम सुखटणकर | (चित्ताकुला), | सदाशिवगड |
| नागेश गणपत तेलंग | (बाड), | दादर |
| वैशाली विनय वाघ | (सदाशिवगड), | वांद्रे |
| प्रकाश शंकर वाघ | (सदाशिवगड), | वांद्रे |
| शंकर विश्वनाथ वागळे | (माजाळी), | दादर |
| शोभा शंकर वागळे | (माजाळी), | दादर |
| रेखा शिवकुमार वागळे | (माजाळी), | जोगेश्वरी |
| काशिनाथ (काशा) दिनकर वागळे | (बाड), | ताडदेव |
| रमाकांत महादेव वागळे | (माजाळी), | पार्ले |
| महेश्वर दत्तात्रय वागळे | (बाड), | पुणे |
| अरुण विश्वनाथ वर्टी | (सदाशिवगड), | जोगेश्वरी |
| इंदू सच्चिदानंद (देवू) | (सदाशिवगड), | पुणे |

## टान्झानिया येथे भारताचे नांव रोशन करणारे सदाशिवगडचे भूमिपूत्र शरद सलगर कालवश

सदाशिवगड हायस्कूलचे शिल्पकार सलगर मास्तर यांचे कर्तबगार व दानशूर सुपुत्र श्री शरद सलगर यांना २०१० साली ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. त्यावेळी मुखपत्रिकेच्या अंकात त्यांच्या टान्झानिया येथील ३५ वर्षाच्या वास्तव्यातील त्यांच्या तेथील विविध क्षेत्रांतील नेत्रदीपक योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली होती. अशा या कर्तृत्ववान व्यक्तीचे २१ मार्च रोजी ठाणे येथे दु:खद निधन झाले.

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

### उल्लेखनीय देणग्या

### कै. राघवेन्द्र दिवेकर यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी

दादर येथे राहणारे श्री राघवेन्द्र उर्फ वसंत रामचंद्र दिवेकर यांचे सुमारे दोन वर्षापूर्वी दु:खद निधन झाले. ते विमा कंपनीत अधिकारी होते. ते अनेक खेळांत प्रवीण होते व त्यासाठी त्यांना अनेक पदकेही मिळालेली आहेत. क्रिकेटमध्ये त्यांनी आपल्या कंपनीला ढालही मिळवून दिलेली आहे. स्वभावानेंही ते अत्यंत खिलाडु वृत्तीचे होते. मनमिळावू व सौजन्यशील स्वभावामुळे ते कुठेही समरस होऊन जात. ज्ञातिसंबंधित कुठल्याही सभेला व सोहळ्याला ते आवर्जून उपस्थित असत.

अलीकडेच त्यांच्या पत्नी श्रीमती शालिनी दिवेकर यांनी पतीच्या स्मरणार्थ शालांत परीक्षेत प्रत्येक विषयांत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी एज्युकेशन सेसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

### कै. मधुकर महेश्वर मुझुमदार यांच्या जन्म शताब्दी निमित्त वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

गेल्या पिढीमध्यें दादर टी.टी. येथील एम. मधुकर अँड ब्रदर्स म्हणजे शिवण-विणकामाच्या साहित्याचे व्यापारी म्हणून सुप्रसिध्द होते. याची स्थापना १९३४ साली झाली होती. कांही वर्षापूर्वी हे दुकान बंद झाले. कारवार येथील प्रसिध्द महेश (मास्तर) मुझुमदार यांचे पुत्र कै. मधुकर मुझुमदार हे दुकान चालवीत होते. त्यांचे कुटुंबीय आपल्या संघाला विविध प्रसंगी भरघोस देणग्या देत असतात. १२ ऑगस्ट १९११ रोजी मधुकररावांची जन्मशताब्दी. त्याप्रसंगी त्यांच्या पत्नी श्रीमती इंदू व इतर कुटुंबियांनी मिळून वृध्द सेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

### कै. विमल व प्रा. वासुदेव त्रिंबक यार्दी यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी

प्रा. वासुदेव त्रिंबक ऊर्फ प्रा. व्ही.टी. यार्दी हे रुईया कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून परिचित होते. विवेकानंद क्लासेसचे ते भागीदार होते. ते वरळी येथील आदर्श नगरमध्ये राहात होते. त्या परिसरांत समाजसेवक म्हणून ते सर्वांना ज्ञात होते. तेथील गरीब जनतेसाठी त्यांनी जनता स्कूल सुरू केले. घरोघरी जाऊन देणग्या गोळा करून त्यांनी ही शाळा उभारण्यांत व चालविण्यांत हातभार लावला. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती विमल यांनी



प्रा. व्ही.टी. यार्दी विश्वस्त निधी स्थापन केला. या निधीतर्फे संघाला गेली सुमारे तीस वर्षे प्रतिवर्षी चार हजार रुपयांची देणगी मिळते.

प्रा. यार्दी यांच्या स्नुषा श्रीमती सुजाता (सरल) सुधीर यार्दी यांनी अलीकडेच आपल्या सासू-सासऱ्यांच्या स्मरणार्थ आपल्या एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

### संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री भिकोबा शेषगिरी मिटबंदर यांच्या स्मरणार्थ मेहुणे श्री पांडुरंग गणपत बर्डे यांजकडून | २०,००० |
| २. | श्रीमती सिंधू सच्चिदानंद नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ नाती कुमारी सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ३. | श्री वसंत मंगेश दुभाषी व श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ दुभाषी कुटुंबीय, पार्ले यांजकडून | २५,००० |
| ४. | श्री दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त अनामिकाकडून | ७,५०० |
| ५. | श्री उल्हास लजपत नाडकर्णी यांच्या ६० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुतणी कुमारी वैशाली निशिकांत नाडकर्णी हिजकडून | १,००० |
| ६. | श्री जयवंत शांताराम कुलकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री अरविंद यांजकडून | १,००१ |
| ७. | श्री गंगाधर गणपत (गंपू) वागळे (बाड, कारवार) यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबियांकडून | ११,००० |
| ८. | श्री गणपतराव महेश्वर मुझुमदार यांच्या ७ व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती सुशीला यांजकडून | ५,००१ |
| ९. | हितचिंतकाकडून | ३००० |
| १०. | श्रीमती सुनीता श्रीपाद बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ नातू कुमार आशिष शैलेश मसुरेकर व नाती कुमारी संपदा व अनुजा नागेश बोरकर यांजकडून | १०,००० |
| ११. | श्रीमती शांता (सुलभा) विनायक नाडकर्णी यांच्या ६व्या पुण्यतिथी निमित्त पती डॉ. विनायक बाबुराव नाडकर्णी यांजकडून | ६,००० |
| १२. | श्रीमती राधाबाई व श्री सुब्राव आत्माराम दिवेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री मारुती सुब्राव दिवेकर यांजकडून | ५,००० |
| १३. | श्री माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या मानसी माधव नायक हिजकडून | १,००० |

| | |
|---|---|
| १४. श्री सदाशिव (जयंत) नीळकंठ तेलंग यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती लक्ष्मी यांजकडून | १०,००० |

**वैद्यकीय साहाय्या प्रीत्यर्थ**

| | |
|---|---|
| १. श्रीमती प्रमिला व श्री शामराव मंगेश पिंगे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री मंगेश यांजकडून | २,००१ |
| २. श्री गोविंद मारुती कसबेकर यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती स्नेहलता यांजकडून | २५,००० |

**वृध्दसेवा निधीसाठी**

| | |
|---|---|
| १. श्री मधुकर महेश्वर मुझुमदार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पत्नी श्रीमती इंदू व कुटुंबियाकडून | ५०,००० |
| २. श्रीमती सुमित्रा व श्री गणपत शिवराव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती गीता गजेंद्र पालेकर यांजकडून | २,००१ |
| ३. श्रीमती ऊर्मिला व श्री मंगेश पुरुषोत्तम नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नातू श्री मंगेश विनय नाडकर्णी व नातसून श्रीमती दक्षा यांजकडून | ५,००१ |
| ४. श्री शंकर दत्तात्रय देसाई यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती विजया दत्ताराम देसाई याजकडून | १०,००० |
| ५. श्रीमती रमाबाई शंकर देसाई यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती विजया दत्ताराम देसाई यांजकडून | १०,००० |
| ६. श्री मारुती सुब्राव दिवेकर यांजकडून ८०व्या वाढदिवसानिमित्त | २१,००० |
| ७. श्रीमती विमल कमलाकर वाघ यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती अजिता सदानंद केंकरे यांजकडून | ५,००० |
| कन्या श्रीमती नंदिनी व जामात श्री जयप्रकाश राजाराम मुझुमदार यांजकडून | ५,००० |

**एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या**

| | |
|---|---|
| १. श्रीमती विमल व प्रा. वासुदेव त्रिंबक (व्ही.टी.) यार्दी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती सुजाता (सरल)सुधीर यार्दी यांजकडून | ५०,००० |
| २. श्रीमती सुमन दयानंद प्रभू हिच्या नावे कन्या श्रीमती विजया विवेकानंद शेणॉय यांजकडून | ५,००१ |
| ३. श्री जयवंत शांताराम कुलकर्णी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री अरविंद यांजकडून | १,००१ |



| | |
|---|---|
| ४. श्री राघवेंद्र रामचंद्र दिवेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शालिनी यांजकडून शालांत परीक्षेत प्रत्येक विषयांत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी | १,००,००० |
| ५. श्री मारुती सुब्राव दिवेकर यांजकडून पत्नी श्रीमती शुभा व पुत्र डॉ. रामानंद यांच्या स्मरणार्थ | ५,००० |
| ६. श्रीमती सविता किशोर सबनीस यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस ट्रस्टकडून | २,५०१ |
| ७. श्रीमती स्नेहलता व श्री वासुदेव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस ट्रस्टकडून | २,५०१ |
| ८. श्रीमती सावित्री बाळकृष्ण गायतोंडे (शिर्सी) यांजकडून कृतज्ञतापूर्वक | १०,००० |
| ९. श्री मधुकर काशिनाथ नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती शालन यांजकडून | ५,००० |
| १०. श्री शरच्चंद्र जयवंत कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुतणी श्रीमती स्नेहा सचिन प्रभू (प्रीतीबाला रत्नाकर कुलकर्णी) यांजकडून | २५,००१ |

**ठाणे मंच देणगीदारांची यादी**

| | |
|---|---|
| १. श्री विनायक रामचंद्र सोमपूरकर, अंधेरी | २,००० |
| २. सौ. लीना प्रवीण नाडकर्णी, अंधेरी | १०,००० |
| ३. हितचिंतक | ५,००० |
| ४. श्री पद्माकर श्रीपाद तेलंग, वांद्रे | ३,००० |
| ५. श्री विनीत हेरवाडकर, ठाणे | १,००० |
| ६. सौ. सीमा अरुण वागळे, पार्ले | १००१ |


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**

**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov/ Churma

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

**Contact : Priya Prakash Telang**

## SHANTA CREATIONS

Shanta™

### DIGITAL MEDIA
- Website Designing & Development
- Flash Web Banners and Presentation
- Optimised Flash Website ❑ and more...

### PRINT MEDIA
- Brochure Designing
- Catalogues & Product Box Designing
- Outdoor Media ❑ and more...

### 3D & VFX
- 3D Modeling, Texturing, Rigging, Lighting
- 3D Animation
- 3D Architectural Walkthrough
- Motion Graphics
- Visual Effects ❑ and more...

Roman House, Opp. Tera Panth Bhavan, Nr. Cambridge School,
Thakur Complex, Kandivali (East), Mumbai - 400 101.
Cell : 93215 95487 / 98202 33202 ● Tele/Fax : 022-2854 2421
www.shantacreations.com ● info@shantacreations.com

## MIPL

## MANGSIDESH INVESTMENT PVT. LTD.

| | | |
|---|---|---|
| Financial Advisors | Equity Trading | Public |
| Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim |
| Postal Schemes | | |

**corporate office**

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.
Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85



Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

## ANNAPURNA TAX BENEFIT SCHEME

**9.25%* p.a.**

**NOW WITH TAX SAVINGS**
**EARN HIGH YIELD 11.58%**
(ON A MATURITY OF 5 YEARS)

*Conditions Apply

**NKGSB**
CO-OP. BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)

ESTD. 1917

**REGD. OFFICE:** Laxmi Sadan, 361, V.P. Road, Girgaum, Mumbai - 400 004
**Tel.: 6754 5000** | **email:** sec@nkgsb-bank.com **www.nkgsb-bank.com**

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.